**नियमीत दिवाणी दावा क्र.७९१/२०२४ व नियमीत दिवाणी दावा क्र.१४९/२०२५ मधील निशाणी क्र.५ वरील संयुक्तीक आदेश**

( CNR : MHAH250007682024 )

१. प्रस्तुत दोन्ही दाव्यातील वादी यांनी नि.५ चे अर्ज प्रतिवादींविरूध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकरता केलेले आहेत.

२. रे.मु.नं.७९१/२०२४ मधील वादींचे म्हणणे असे की, वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादीक्र.३यांना त्यांचे हिश्याचे खरेदीखत लिहुन नोंदवुन देताना त्यात असणारे विहीर तसेच २ बोअरवेलमध्ये प्रतिवादी क्र.१ यांचा समाईक १/४ हिस्सा असतानाही त्यांनी खरेदीखतात स्वतंत्र विहीर व २ बोअरवेल असे वर्णन नमुद करुन दावा मिळकतीचे दि.२८.५.२०२४ रोजी दस्त क्र.४६२९/२०२४ अन्वये जे खरेदीखत लिहुन दिले ते खरेदीखत वादी यांचे दावा मिळकतीत असणारी विहीर तसेच २ समाईक बोअरवेलमध्ये वादी यांचा असणारा प्रत्येकी १/४ हिश्याने पाणी घेण्याचे हक्कावर मुळीच बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवुन मिळण्यासाठी तसेच सदर खरेदीखताचे आधारे प्रतिवादी यांनी वादीचे दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीत असणारे समाईक विहीर तसेच समाईक २ बोअरवेलमधील हिश्याप्रमाणे पाणी घेण्याचे कामी स्वतः अगर नोकर, चाकर, नातेवाईक वा इतर कोणाहीमार्फत हरकत अडथळा करु नये असा निरंतर ताकीद मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा कलम १ मधील मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांची वडीलोपार्जीत मालकीची एकत्र कुटुंबाची मिळकत होती. त्यांच्या एकत्र कुटुंबाचे मुळ पुरुष पिरतु पठारे होते व त्यांचे नावे एकत्र् कुटुंबाचा कर्ता या नात्याने दावा मिळकत होती. तिचा जुना सर्वे क्र.१४८ होता. पिरतु पठारे यांना ४ मुले पोपट, हनुमंत, सोपान व दामोधर अशी आहेत. त्यापैकी पोपट मयत असुन त्यांना वादी क्र.४ वारस आहेत. तसेच सोपानदेखील मयत त्यांना वादी क्र.१ वारस आहेत. तसेच हनुमंत यांना वादी क्र.२ व ३ अशी मुले आहेत. मुळ पुरुष पिरतु पठारे यांनी दि.६.५.१९८५ रोजी महसुल खात्याकडे अर्ज

देवुन सदर मिळकत त्यांची ४ मुले पोपट, हनुमंत, सोपान व दामोधर यांच्यादरम्यान प्रत्येकी ० हे. ४६ आर याप्रमाणे वाटप करुन देण्यात यावी अशी विनंती केली. त्यानुसार सदर मिळकतीचे वाटप होवुन गावदत्परी फेरफार क्र.१५८ अन्वये वरील ४ मुलांच्या नावाची नोंद घेण्यात आली. अशाप्रकारे १९८५ पुर्वीपासुन वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान दावा मिळकतीचे वाटप होवुन त्यावाटपाप्रमाणे ज्याची त्याची स्वतंत्ररित्या वहिवाट आहे. तसेच सदरील दावा मिळकतीत असणारी समाईक विहीरीची नोंद सन १९६३ पासुन आहे.

३. दावा कलम १ मधे नमुद मिळकतीत वादी व प्रतिवादीयांची पुर्वापार अशी समाईक विहीर असुन त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना त्यांचे क्षेत्राप्रमाणे समान पाणी वापरण्याचा हिस्सा आहे. तसेच दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचे समाईक २ बोअरवेल असुन त्यामध्ये देखील वादी व प्रतिवादी यांच्यादरम्यान वर नमुद केलेप्रमाणे त्यांच्या क्षेत्राप्रमाणे १/४ हिस्सा असुन त्याप्रमाणे जो तो विहीर व बोअरवेलच्या पाण्याचा वापर करीत असुन ज्याचे त्याचे क्षेत्रात पाणी नेण्यासाठी पाईपलाईन केलेल्या आहेत. दरम्यान सन २०१६ मध्ये वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान विहीर पाणी तसेच बोअरवेलचे पाणी हिश्याप्रमाणे वाद होवु लागल्याने त्यांनी दि.१९.१०.२०१६ रोजी विहीर व बोअरवेलचे पाणी कसे वापरायचे याबाबत पाळया ठरवुन घेवुन तसा लेखी करारनामा करण्यात आला असुन त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांची आजतागायत प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट आहे. सन २०२० साली वादी व प्रतिवादींनी एकत्रात खर्च करुन समाईक विहीरीस रिंग टाकली आहे. विहरीवरील इले.कनेक्शन हे पोपट पिरतु पठारे यांचे नावे असुन बोअरवेलचे कनेक्शन दामोदर पिरतु पठारे यांचे नावे आहे. दावा मिळकतीत असणारे समाईकविहरीर तसेच बोअरवेल हे पक्रतिवादी क्र.१ यांच्या वाटणीत आहे मात्र त्याचा वापर वादी व प्रतिवादी हे आपआपल्या हिश्याप्रमाणे करीत आलेले आहेत.

४. दरम्यानचे काळात प्रतिवादी क्र.१ ने त्यांचे मालकीचे ० हे ४६ आर क्षेत्र हे प्रतिवादी क्र.३ सुनबाई संगिता सुनिल पठारे हिच्या नावे दि.२८.५.२०२४

रोजी रजि.खरेदीखत दस्त क्र.४६२९/२०२४ ने विक्री केले. सदर खरेदीखत नोंदवताना दावा मिळकतीमध्ये असणारी वादी व प्रतिवादी यांची समाईक विहीर व समाईक २ बोअरवेल असतानाही प्रतिवादी क्र.१ ने खरेदीखत देताना प्रतिवादी क्र.३ यांना ० हे. ४६ आर क्षेत्र त्यात एक स्वतंत्र विहीर व २ स्वतंत्र बोअरवेल अशाप्रकारे चुकीचा उल्लेख करुन सदरचे खरेदीखत नोंदवुन दिले. त्याआधारे प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादी यांना विहीर व बोअरवेलचे पाणी वापरण्याचेकामी हरकत करु लागले आहेत. वादी यांना सदर खरेदीखताची माहीती होताच त्यांनी सदर खरेदीखताचे नोंदीस हरकत घेतली असता मंडळाधिकारी पळवे खुर्द यांनी दि.२७.८.२०२४ रोजी वादींची तक्रार रद्द करुन बोगस खरेदीखतावरुन प्रतिवादी क्र.३ च्या नावाची स्वतंत्र विहीर तसेच २ बोअरवेलसह ० हे ४६ आर क्षेत्रास नोंद घेण्याबाबतय आदेश केला आहे. त्याविरुध्द वादी हे उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा पारनेर भाग यांचेसमोर अपील दाखल करीत आहे. सदरचे प्रतिवादी क्र.१ ने केलेले खरेदीखत वादी यांच्या विहीर व बोअरवेलमधील समाईक १/४ हिश्याप्रमाणे पाणी घेण्याचे हक्कावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवुन मिळणेसाठी वादींचा दावा आहे. दि.१५.८.२०२४ रोजी वादी दावा मिळकतीत असणारी विहीर व बोअरवेलवरील त्यांचे पाळीप्रमाणे पाणी घेण्यास गेले असता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी आडवे येवुन विहीर व बोअरवेल आमचे स्वतंत्र आहे, तुमचा काहीही संबंध नाही असे म्हणुन पाणी घेण्याचे कामी हरकती सुरु केल्या आहेत. प्रतिवादींच्या हरकतीमुळे वादींना विहीर व बोअरवेलला पाणी असुन देखील पिकांना पाणी देणे अशक्य झाले आहे. प्रतिवादींच्या अशा हरकतीमुळे वादींचे जमिनीत असणारे पिक पाण्याअभावी जळुन जातील व त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादी यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीत असणारी समाईक विहीर व २ समाईक बोअरवेलचे वादीच्या हिश्याप्रमाणे/पाळीप्रमाणे पाणी घेण्याचे कामी, मोटार चालु करण्याचे कामी कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये यासाठी तुर्तातुर्त मनाईची मागणी केली आहे.

५. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.१३ वर दाव्याची व मनाई हुकुमाच्या अर्जाची कैफीयत देवुन अर्जास विरोध दर्शवला आहे. प्रतिवादींचे कथन की, दावा व मनाई हुकुमाचा अर्ज खरा नसुन कायदेशीर व मेंटेनेबल नाही. दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येत असल्याने तो रद्द करण्यात यावा. दाव्यात वादींनी मिळकतीचे वर्णन चुकीचे, अपुर्ण दिलेले असुन दावा मिळकतीचे कोणते क्षेत्र वादीचे, प्रतिवादीचे व इतर सहहिस्सेदारांची आहे याचा उल्लेख मिळकतीच्या वर्णनात नाही. तसेच मिळकतीचे वर्णन वस्तुस्थितीदर्शक नाही. संपुर्ण गट नं.५ मध्ये एकुण किती बोअरवेल्स, कोणाकोणाच्या वस्त्या व घरे कोठे आहेत याचा उल्लेख वादीने मिळकतीचे वर्णनात केलेला नाही तसेच वादी कोणत्या क्षेत्रातील विहीर, बोअरवेल्सबद्दल दाद मागत आहे याचा बोध मिळकतीचे वर्णनावरुन होत नाही. वास्तविक वादींनी सि.प्रो.को.ऑ.७ रुल ११ नुसार मिळकतीचे वर्णन identify होणेसाठी नकाशा द्यावयास पाहीजे होता व ती तरतुद mandatory असल्याने व तसा नकाशा न दिलेने वादीचा दावा चुकीचे व अपुर्ण मिळकतीचे वर्णनावरुन वादीचा दावा दर्द करण्यात यावा. दावा मिळकतीत प्रतिवादीचे मालकीचे क्षेत्रात असलेलीविहीर व २ बोअरवेल्स हे प्रतिवादींचे स्वतंत्र् मालकीचे असुन ती विहीर व ते २ बोअरवेल्स वादी व प्रतिवादीचे समाईक मालकीचे नाहीत. वादी व प्रतिवादीमध्ये दि.१९.१०.२०१६ रोज विहीर पाणी व बोअरवेलबाबत कोणताही लेखी करारनामा झाला नाही व व तथाकथीत करारनाम्यावर त्यांची सही सुध्दा नाही. प्रतिवादींचे कथन की हल्लीचा दावा करण्याअगोदर वादी व सुलोचना पठारे यांनी रे.मु.नं.४२२/२०२४ चा दावा खोटया मजकुराचा दाखल केला. त्यामध्ये हल्लीचे वादींनी हल्लीचे प्रतिवादी नं.१ यास सामील न करता त्याचे नावावरील व ताब्यामध्ये असणा-या स्वतंत्र् विहीरीचा व २ बोअरवेल्सचे पाण्योच वापरात व पाण्याचा हिस्सा आपआपसात ठरवुन सुलेनामा करुन घेतला. वास्तविक सदरचा हुकुमनामा हा हल्लीचे प्रतिवादी नं.१ पिरतु पठारे यांचेवर मुळीच बंधनकारक नाही व त्याबद्दल

प्रतिवादी हे अलाहिदा दावा करीत आहेत. त्या दाव्याची म्हणजे रे.मु.नं.४२२/२०२४ ची बाब त्यांनी हेतुपुरस्सर हया दाव्यामध्ये दर्शवलेली नाही. वास्तविक पक्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी नं.२ यांना गट नं.५ मधील ०.४६ आर क्षेत्राचा खरेदीचा करुन दिलेला दस्त हा दि.२८.५.२०२४ रोजी झालेला असतानांही त्या दाव्यात हया खरेदीखताचा उल्लेख केला नाही. सदरचा रे.मु.नं.४२२/२०२४ दाखल करुन त्यामध्ये दि.२१.६.२०२४ रोजी तडजोड करुन घेतली असली तरी त्या तडजोडीचा काहीएक उपयोग होणार नाही असे वाटल्यानंतर हा दावा दि.१४.६.२०२४ रोजी दाखल केला आहे.

६. प्रतिवादींचे पुढे कथन की वादीचे पुर्वहक्कदार व प्रतिवादी क्र.१ यांचेमध्ये वडीलोपार्जीत इस्टेटीचे वादीने दाव्यात नमुद केल्याप्रमाणे फार पुर्वी वाटप झालेले होते व ते वाटप १९६१-६२ चे सुमारास झालेले होते. मात्र त्या वाटपानुसार दि.६.५.१९८५ चे अर्जाप्रमाणे वादीचे पुर्वहक्कदार व प्रतिवादी क्र.१ यांनी महसुल खात्याकडे अर्ज देवुन फेरफार नोंद नं.१५८ ने नोंद करुन घेतली. वास्तविक वादातील विहीरही प्रतिवादी क्र.१ ने वाटपानंतर त्याचे आलेल्या स्वतंत्र हिस्यामध्ये १९६३ चे सुमारास विहीर खोदली. परंतु त्या विहीरीस पाणी न लागल्याने तिचे खोदकाम सुमारे २ ते ३ परस करुन त्या विहीरीभोवती रिंग टाकुन बांधकाम केले. त्या विहीरीवर पोपट पठारे यांचे नावे विज मंडळाकडुन कनेक्शन घेतले नव्हते तर प्रतिवादी क्र.१ दामोदर पिरतु पठारे यांचे नावाने घेतले होते व ते आजही इले.मोटारीचे बील भरीत आलेले आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१ दामोदर पिरतु पठार यांनी स्वतंत्रपणे २ बोअरवेल्स त्यांचे वाटणीत आलेल्या गट नं.५ मधील क्षेत्रामध्ये घेतलेले आहेत व त्याचा वापर स्वतंत्रपणे प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेसह करीत आलेले आहेत.

७. प्रतिवादी क्र.१ ते ३ चे कथन की वादी व प्रतिवादींच्या नातेसंबंधाबाबत तसेच वाटपाबाबत व प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.३ हिस

दि.२८.५.२०२४ रोजी करुन दिलेल्या खरेदीखताबाबतची कथने वगळता इतर सर्व कथने चुकीची, खोडसाळपणाची व दिशाभुल करणारी असुन प्रतिवादींना कबुल नाहीत. प्रतिवादींनी जी मुळ दाव्याची कैफीतय दिली आहे तीच कैफीयत मनाई अर्जाचे चौकशीकामी पुराव्यात वाचण्यात यावी. वादींना प्रायमा फेशी केस नाही व बॅलन्स ऑफ कन्व्हेनिअन्स त्यांचे बाजुने नाही. वास्तविक वादींनीत्यांना मिळालेल्या गट नं.५ मधील वाटपाचे क्षेत्रात स्वतंत्र् बोअरवेल असुन ते त्याचे पाणी स्वतंत्रपणे त्यांचे जमिनींना देत आलेले आहेत. त्यामुळे वादींनी मागितल्याप्रमाणे मनाई हुकुमन न दिल्यास त्यांचे काहीएक नुकसान होणार नाही. सबब वादीचा मनाई हुकुमाचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा व प्रतिवादींना मानसिक त्रास दिल्याबाबत वादीकडुन कॉम्पेनसेटरी कॉस्ट रु.५००००/- देववावी, अशी विनंती केली आहे.

**<u>रे.मु.क्र.१४९/२०२५ मधील वादीचे नि.५ मधील कथन की</u>**,

८. दाव्यात नमुद केल्यानुसार वडीलोपार्जीत इस्टेटीचे पिरतु पठारे यांच्या मुलांचे दरम्यान सन १९६१-६२ चे सुमारास झालेले असुन त्यानुसार दावा मिळकत ही दामोदर पठारे यांचे हिश्यास आलेली होती व तेव्हापासुन ती दामोदर पठारे यांच्या ताब्यात मालकीहक्काने वहिवाटीस होती. पुढे दामोदर पठारे यांनी दावा मिळकतीत स्वतंत्रपणे एक विहीर खोदली व २ बोअरवेल स्वतंत्रपणे घेवुन त्या विहीरीचा व बोअरवेलचा वापर ते मालकीहक्काने व स्वतंत्रपणे करीत आलेले होते. त्याचप्रमाणे गट नं.५ मधील विहीरीवरील इले. मोटारचे विज बीलावर गट नं.५ व दामोदर पठारे अशी नोंदही आहे. गट नं.५ मधील प्रतिवादीचे पुर्व हक्कदारास वाटपात मिळालेले क्षेत्र दाव्यासोबत दाखल शेडयुल-अ मधील नकाशात स्वतंत्र्पणे दर्शवलेले आहे. तसेच प्रतिवादींनी ज्याचे त्याचे वाटणीत स्वतंत्रपणे घरे बांधलेली आहेत. वाटप प्रत्यक्षात १९६१-६२ चे सुमारास झाले असलेतरी प्रत्यक्षात आणेवारीने नोंद फेरफार नं.१५८ ने १९८५साली झालेली आहे. वाटपाबाबत हल्लीचे प्रतिवादींनी रे.मु.नं.४२२/२०२४

मधील दाव्यामध्ये वाटपाची कथने करुन व नकाशा दर्शवुन कबुल केलेली आहे.

९. वास्तविक विहीरीचे व बोअरवेलचे पाण्यावरुन प्रतिवादींनी वादीचे सास-यांना मारहाण केलेली असुन त्यामुळे त्यांना मुका मार लागुन फ्रॅक्चर झालेले आहे व तशी केस पारनेर कोर्टात दाखल आहे. प्रतिवादींचा दावा मिळकतीमधील विहीर व २ बोअरवेल्समध्ये काहीही हक्क हितसंबंध नाही परंतु मनगटाचे जोरावर व दांडगाईने वादीस दावा मिळकतीतील विहीरीचे व २ बोअरवेल्सचे पाणी स्वतंत्रपणे घेण्यास दि.२५.१.२०२५ रोजी हरकत अडथळा केलेला आहे. दाव्याचा निकाल होण्यास बराच कालावधी लागेल. दरम्यानचे काळात वादीस दावा मिळकतीमधील स्वतंत्र विहीरीचे व २ बोअरवेल्सचे पाणी तिला घेता न आल्यास पाण्याअभावी पिके जळुन जातील व तिचे अतोनात व कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. सबब दाव्याचा निकाल होईपावेतो प्रतिवादींनी स्वतः वा इतर कोणाहीमार्फत वादीस तिला दावा मिळकतीमधील स्वतंत्र विहीरीचे पाणी व २ बोअरवेल्सचे पाणी स्वतंत्रपणे घेण्यास हरकत अडथळा करु नये असा प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्याची विनंती केली आहे.

**रे.मु.क्र.१४९/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.५ वरील मुळ दाव्यास व नि.५ वरील अर्जास नि.१० वर म्हणणे दिले असुन त्यांचे कथन की,**

१०. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दावा कलम १ मधील मिळकतीचे वर्णन कबुल करुन इतर सर्व बाबी नाकारलेल्या आहेत. सदर प्रतिवादींनी पुढे कथन केले की दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या वडीलोपार्जीत मालकीची एकत्र कुटुंबाची मिळकत होती. वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंबाचे मुळ पुरुष पिरतु पठारे होते व त्यांचे नावे एकत्र कुटुंबाचा कर्ता या नात्याने दावा मिळकत होती. दावा मिळकतीचा जुना सर्वे नं.१४८ असा होता. पिरतु पठारे यांना एकुण ४ मुले पोपट, हनुमंत, सोपान व दामोधर अशी आहेत. मुळ पुरुष पिरतु पठारे यांनी त्यांच्या हयातीत दि.६.५.१९८५ रोजी महसुल खात्याकडे अर्ज देवुन सदरची मिळकत त्यांची ४

मुलांच्या दरम्यान प्रत्येकी ० हे ४६ आर याप्रमाणे वाटप करुन देण्यात यावी अशी विनंती केली. त्यानुसार सदर मिळकतीचे वाटप होवुन गावदत्पटरी फेरफार क्र.१५८ अन्वये वरील ४ मुलांच्या नावाची नोंद घेण्यात आली. अशाप्रकारे १९८५ पुर्वीपासुन वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान दावा मिळकतीचे वाटप होवुन त्यावाटपाप्रमाणे ज्याची त्याची स्वतंत्ररित्या वहिवाट आहे. तसेच सदरील दावा मिळकतीत असणारी समाईक विहीरीची नोंद सन १९६३ पासुन आहे.

११. दावा कलम १ मधे नमुद मिळकतीत वादी व प्रतिवादीयांची पुर्वापार अशी समाईक विहीर असुन त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना त्यांचे क्षेत्राप्रमाणे समान पाणी वापरण्याचा हिस्सा आहे. तसेच दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचे समाईक २ बोअरवेल असुन त्यामध्ये देखील वादी व प्रतिवादी यांच्यादरम्यान वर नमुद केलेप्रमाणे त्यांच्या क्षेत्राप्रमाणे १/४ हिस्सा असुन त्याप्रमाणे जो तो विहीर व बोअरवेलच्या पाण्याचा वापर करीत असुन ज्याचे त्याचे क्षेत्रात पाणी नेण्यासाठी पाईपलाईन केलेल्या आहेत. परंतु सदरील समाईक विहीर व २ बोअरवेल हे दामोधर पठारे यांच्या हिश्यास आलेल्या क्षेत्रामध्ये आहेत. जरी त्यांचे क्षेत्रात असले तरी त्याचा वापर वादी व प्रतिवादी हे समाईक हिश्याप्रमाणे करीत आलेले आहेत. अशाप्रकारे वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीतील विहीर व २ बोअरवेलमध्ये समाईक कब्जा वहिवाट असून त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी हे विहीर पाण्याचा व बोअरच्या पाण्याचा उपयोग करीत आहेत. दरम्यान सन २०१६ मध्ये वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान विहीर पाणी तसेच बोअरवेलचे पाणी हिश्याप्रमाणे वाद होवु लागल्याने त्यांनी दि.१९.१०.२०१६ रोजी विहीर व बोअरवेलचे पाणी कसे वापरायचे याबाबत पाळया ठरवुन घेवुन तसा लेखी करारनामा करण्यात आला असुन त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांची आजतागायत प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट आहे. सन २०२० साली वादी व प्रतिवादींनी एकत्रात खर्च करुन समाईक विहीरीस रिंग टाकली आहे. विहीरीवरील इले.कनेक्शन हे पोपट पिरतु पठारे यांचे नावे असुन बोअरवेलचे कनेक्शन दामोदर पिरतु पठारे यांचे नावे आहे.

दावा मिळकतीत असणारे समाईकविहीर तसेच बोअरवेल हे प्रतिवादी क्र.१ यांच्या वाटणीत आहे मात्र त्याचा वापर वादी व प्रतिवादी हे आपआपल्या हिश्याप्रमाणे करीत आलेले आहेत.

१२. दरम्यानचे काळात वादीने त्यांचे मालकीचे ० हे ४६ आर क्षेत्र हे दामोधर पठारे यांनी सुनबाई संगिता सुनिल पठारे हिच्या नावे दि.२८.५.२०२४ रोजी रजि.खरेदीखत दस्त क्र.४६२९/२०२४ ने विक्री केले. सदर खरेदीखत नोंदवताना दावा मिळकतीमध्ये असणारी वादी व प्रतिवादी यांची समाईक विहीर व समाईक २ बोअरवेल असतानाही दामोधर याने खरेदीखत देताना वादी संगिता हिला ० हे. ४६ आर क्षेत्र त्यात एक स्वतंत्र विहीर व २ स्वतंत्र बोअरवेल अशाप्रकारे चुकीचा उल्लेख करुन सदरचे खरेदीखत नोंदवुन दिले. त्याआधारे वादी हे प्रवादी यांना विहीर व बोअरवेलचे पाणी वापरण्याचेकामी हरकत करु लागले आहेत. वादी यांना सदर खरेदीखताची माहीती होताच त्यांनी सदर खरेदीखताचे नोंदीस हरकत घेतली असता मंडळाधिकारी पळवे खुर्द यांनी दि.२७.८.२०२४ रोजी प्रवादींची तक्रार रद्द करुन बोगस खरेदीखतावरुन वादीच्या क्र.३ च्या नावाची स्वतंत्र विहीर तसेच २ बोअरवेलसह ० हे ४६ आर क्षेत्रास नोंद घेण्याबाबतय आदेश केला आहे. त्याविरुध्द प्रतिवादी हे उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा पारनेर भाग यांचेसमोर अपील दाखल करीत आहे. सदरचे प्रतिवादी क्र.१ ने केलेले खरेदीखत वादी यांच्या विहीर व बोअरवेलमधील समाईक १/४ हिश्याप्रमाणे पाणी घेण्याचे हक्कावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवुन मिळणेसाठी वादींचा दावा आहे. दि.१५.८.२०२४ रोजी प्रतिवादी हे दावा मिळकतीत असणारी विहीर व बोअरवेलवरील त्यांचे पाळीप्रमाणे पाणी घेण्यास गेले असता वादी यांनी आडवे येवुन विहीर व बोअरवेल आमचे स्वतंत्र आहे, तुमचा काहीही संबंध नाही असे म्हणुन पाणी घेण्याचे कामी हरकती सुरु केल्या आहेत. वादींच्या हरकतीमुळे प्रतिवादींना विहीर व बोअरवेलला पाणी असुन देखील पिकांना पाणी देणे अशक्य झाले आहे. वादींच्या अशा हरकतीमुळे प्रतिवादींचे जमिनीत असणारे पिक पाण्याअभावी जळुन जातील व त्यांचे

कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे वादी यांना प्रतिवादींनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीत असणारी समाईक विहीर व २ समाईक बोअरवेलचे वादीच्या हिश्याप्रमाणे/पाळीप्रमाणे पाणी घेण्याचे कामी, मोटार चालु करण्याचे कामी कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये यासाठी वादीने केलेली तुर्तातुर्त मनाईची मागणी मान्य करु नये अशी विनंती केली आहे.

१३. दाव्यातील वादी यांचे वकिल श्री. वाय. बी. पाटील व प्रतिवादीचे वकील श्री. एम. आय. संकलेचा यांचा युक्तीवाद ऐकला.

१४. वादी यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझी उत्तरे त्याखाली नमुद केलेल्या कारणासाठी पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **उत्तरे** |
|---|---|---|
| १. | तुर्तातुर्त मनाई मिळणेस सकृतदर्शनी स्थिती कोणाच्या बाजुने आहे? | वादी व प्रतिवादी दोघांच्या बाजुने |
| २. | तुर्तातुर्त मनाई मिळणेस सोईचे समतोलत्व कोणाच्या बाजुने आहे ? | वादी व प्रतिवादी दोघांच्या बाजुने |
| ३. | तुर्तातुर्त मनाई नाकारलेस कोणाचे पैशाने भरुन न येणारे नुकसान होईल ? | वादी व प्रतिवादी दोघांच्या बाजुने |
| ४. | काय आदेश ? | नि.५ वरील अर्ज मंजुर करण्यात आला. |

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ बाबत</u> :-**

१५. वादीने सदरच्या मागणीस पात्र ठरण्यासाठी वादीला प्रथमदर्शनी केस आहे हे शाबित करणे आवश्यक व गरजेचे आहे. तुर्तातूर्त मनाईची मागणी मंजुर करताना वादी व प्रतिवादी या दोन्हींच्या नुकसान तसेच न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे हे पडताळणे आवश्यक असते.

१६. रे.मु.नं.७९१/२०२४ मध्ये वादीने सकृतदर्शनी केस सिध्द करण्यासाठी गट नंबर ५ चा सातबारा उतारा, फेरफार नं. १७७४ चा उतारा, मंडळ अधिकारी पळवे खुर्द यांचे समोरील तक्रार केस नं. १०८/२०२४, माजी सैनिकांच्या जमिनीबाबतचा तक्रार अर्ज, वहिवाटीस व पाणी वापराबाबत केलेला अर्ज, महवितरण लाईटबील, फेरफार नंबर. १७७४ ची नोंद न होण्याबाबतचा अर्ज, तक्रार केस नंबर. १०८/२०२४ चा अर्ज, तहसिलदार पारनेर यांना दिलेला तक्रार अर्जाची प्रत, दस्त क्रमांक ४६२९ चे खरेदीखत, सी. आर. नंबर ३४३/२०२४ चे सत्यप्रत, एन. सी. नंबर ३६२/२०२४ ची सत्यप्रत, करारनाम्याची झेरॉक्स प्रत, शेतीमाल विक्री व कर्जवसुलीचे पासबुक, भुविकास बॅकेचे कर्जाचे कागदपत्र आणि रेशनकार्ड ची प्रत दाखल केली आहे. याउलट प्रतिवादीने आधारकार्ड, गट नंबर ५ मधील मोटरचे लाइटबील, रे.मु. नंबर. ४२२/२०२४ चे हुकूमनाम्याचे सत्यप्रत आणि प्रतिवादी नं.१ यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

१७. दोन्ही दाव्याचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सन १९६१-६२ मध्ये वाटप झाल्याचे वादी प्रतिवादी दोन्ही दाव्यात मान्य करतात. वादीचे कथन असे आहे की गट नं.५ मधील विहीर व २ बोअरवेल ही समाईक असुन त्यामध्ये सर्वांचा हिस्सा अधिकार आहे. तर प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की गट नं.५ मधील विहीर व २ बोअरवेल हे प्रतिवादींचे स्वतंत्र बोअरवेल आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये विहीरीच्या पाण्याबाबत वाद निर्माण झालेला आहे. विहीर ही समाईक होती की नाही,

विहीरीसंदर्भामध्ये काय वाटप झाले होते किंवा विहीर ही प्रतिवादीने स्वतंत्र्पणे खोदलेली आहे ही गोष्ट पुराव्यानंतर निश्चित होईल. सद्यस्थितीला प्रथमदर्शनी असे दिसुन येते की विहीरीवरील लाईट बिल हे वादी यांच्या नावावर आहे. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या करारनामावर वादी व प्रतिवादी यांची सही असल्याचे दिसुन येते. त्यांच्यामध्ये विहीरीचे पाणी वापरण्याबाबत समझोता झाल्याचे दिसुन येते. याउलट प्रतिवादी यांचेकडे गट नं.५ मधील विहीर व २ बोअरवेल हेत्यांचे स्वतंत्र आहेत याबाबत कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही.

१८. प्रतिवादी यांनी रे.मु.नं.१४९/२०२५ मध्ये कथन केल्याप्रमाणे वादी यांनी त्यांची बहीण सुलोचना पठारे हिच्यासोबत न्यायालयामध्ये रे.मु.नं.४२२/२०२४ दाखल करुन त्यामध्ये प्रस्तुत प्रतिवादी यांना सामील न करता आपआपसामध्ये गट नं.५ बाबत तडजोड करुन घेतली आहे. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या तडजोडनाम्यावरुन सदरची बाब दिसुन येते. परंतु त्यापुर्वीच दि.२८.५.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या लाभात खरेदीखत करुन विहीर व बोअरवेल लिहुन दिलेले दिसुन येते.

१९. वादी व प्रतिवादी यांचे कथन पाहता दोघांना शेतीच्या कामासाठी विहीरीच्या पाण्याची गरज आहे. विहीर व बोअरवेल हे समाईक आहेत की प्रतिवादी यांचे स्वतंत्र बोअरवेल आहेत हे पुराव्याअंती निश्चित होईल. परंतु तोपर्यंत जर वादी व प्रतिवादी यांनी एकमेकांना हरकत अडथळा केला तर त्यावरुन वाद उदभवेल आणि पिकांचे नुकसान होईल. त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत वादी व प्रतिवादी यांनी दोघांनी गट नं.५ मधील विहीर व दोन्ही बोअरवेल मधील पाणी हे समाईकरित्या वापरावेत हे न्यायोचित होईल. वादीचे कथनांप्रमाणे मुळ पुरुष पिरतु यांना पोपट, हनुमंत, सोपान आणि दामोधर असे चार मुले आहेत. त्यामुळे त्यांचे हिस्से गृहीत धरता प्रथमदर्शनी प्रत्येकाचा १/४ असा हिस्सा येतो. वादी व प्रतिवादी या दोघांना प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा तराजु दोघांच्या बाजुने समान आहे. तसेच दोघांचे न भरुन येणारे असे नुकसान होईल. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे

उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र.४ बाबत</u> :-**

२०. मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्याकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. रे.मु.नं.७९१/२०२४ व रे.मु.नं.१४९/२०२५ मधील अर्ज (निशाणी क्र.५) मंजुर करण्यात येत आहे.

२. रे.मु.नं.७९१/२०२४ व रे.मु.नं.१४९/२०२५ मधील वादी व प्रतिवादी यांनी या दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो दावा मिळकत गट नं.५ मधील विहीर व दोन्ही बोअरवेल मधील पाणी हे समाईकरित्या १/४ हिस्साने वापरावेत.

३. रे.मु.नं.७९१/२०२४ व रे.मु.नं.१४९ /२०२५ मधील वादी व प्रतिवादी यांनी या दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो दावा मिळकत गट नं.५ मधील मधील विहीर व दोन्ही बोअरवेल मधील समाईकरित्या पाणी वापरताना एकमेकांना हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येतो.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI

Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2025.04.16 11:04:36 +0530

**( एस. सी. साळवी )**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**

**दि. ११.०४.२०२५**
**पारनेर**